N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सातारा　　**P.S.(ठाणे):** लोणंद

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0045　　**Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/01/2024 21:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार　　**Date From (दिनांक पासून):** 29/01/2024

**Time Period (कालावधी):** पहर 4　　**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/01/2024

**Time From (वेळेपासून):** 12:51 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/01/2024　　**Time (वेळ):** 21:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 027

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/01/2024 21:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी　　**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कोरेगाव,फलटण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कैलाश बापुराव पांढरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोरेगाव,फलटण ,लोणंद ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोरेगाव,फलटण ,लोणंद ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9850129694

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मोहंमद शफी इब्राहीम मुलाणी | | | 1. फलटण ,फलटण ,लोणंद , सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

खबरी जबाब दि. 29/01/2024

मी, कैलाश बापूराव पांढरे, वय - 42 वर्षे, व्यवसाय- शेती, रा. कोरेगाव पो.खंडाळा ता. फलटण जि. सातारा मो.नं. 9850129694

मी दि.25/01/2024 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथे फोन करुन पोलीस उपअधीक्षक श्री राजेश वाघमारे यांना संपर्क साधुन माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत थोडक्यात तक्रार सांगितली व माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती केली. तेव्हा त्यांनी पोलीस निरीक्षक विक्रम पवार हे तुमच्या तक्रारीवर पुढील कारवाईचे नियोजन करतील असे सांगीतले.

त्या नियोजनानुसार दि.26/01/2024 रोजी 09.00 वा. चे सुमारास पोलीस निरीक्षक श्री. पवार ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा यांनी मला संपर्क करून फरांदवाडी ता.फलटण जि. सातारा येथील संत निरंकारी सत्संग भवन, समोर येवून थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे पो.नि. पवार हे त्यांचे सहकाऱ्यासह शासकीय वाहनाने सदर ठिकाणी 10.00 वाचे सुमारास येऊन पोहोचले. तेव्हा पो.नि.पवार यांनी माझी ओळख करुन घेऊन त्यांचे सह असणाऱ्या दोन पंचाची व इतर सहकाऱ्यांची आम्हाला एकमेंकाना ओळख करुन दिली. तेव्हा मी माझी तोंडी तक्रार सांगितली. त्यामध्ये आमचे वडिलोपार्जित जमीनीचे गट नं. 90 मधील जमीनीची मोजणी दिनांक 17/01/2024 रोजी फलटण येथील भूमी अभिलेख कार्यालयाचे मुलाणी साहेब यांनी केली होती. त्यावर दिनांक 23/01/2024 रोजी तात्पुरत्या स्वरूपात हद्दी दाखविल्या होत्या. परंतू तांत्रिक अडचणी मुळे त्या जमीनीच्या हद्दीच्या कायमच्या खुणा दाखविल्या नव्हत्या. त्या हद्दीच्या खुणा कायम करण्यासाठी मदत करतो असे म्हणून भूमी अभिलेख कार्यालय, फलटण मधील, मुलाणी साहेब हे माझ्याकडे 10,000/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबतची तक्रार पंचासमक्ष पोनि पवार यांना सांगितली. व माझी तक्रार पोनि पवार यांना दिली असता पोनि पवार व पंचांनी ती वाचून बघितली व त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर पो.नि. पवार यांनी मला पंचासमक्ष तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानंतर लागलीच पो.नि.पवार यांनी पडताळणी कारवाईचे नियोजन केले. त्यानंतर पो. नि. पवार यांनी पंचासमक्ष मला पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझे शर्टचे आतील बाजूस व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन लावून दिले व तेथून 11.07 वा.चे सुमारास मी व पंच नं.1 खंडागळे असे आम्ही दोघे माझ्या मोटार सायकलवरून जिंती नाका, फलटण येथे मुलाणी साहेब यांची समक्ष भेट घेणेकामी रवाना झालो. जिंती नाका येथे पोहचल्यानंतर मुलाणी साहेब कोठे आहेत हे पाहण्यासाठी मी मुलाणी साहेब यांच्या मोबाईल फोन केला असता ते पुढे निघून गेले असलेबाबत त्यांनी सांगितले. व पुढे वडजल येथे भेटणेस येणेसाठी सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच असे मोटार सायकलवरून वडजल येथे गेलो. त्यावेळी मुलाणी साहेब हे त्यांच्या चारचाकी वाहनात बसलेले होते. त्यांनी मला गाडीत बसण्यास सांगितले. तेव्हा आमचेत माझे कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा मुलाणी साहेब यांनी मला " दहा म्हणलो होतो. द्या काय, द्यायचे ते तुमच्या हिशोबाने, चला जाऊद्यात मला " असे बोलून माझ्याकडे 10,000/- रु लाचेची मागणी केली. त्यानंतर ते त्यांचे चारचाकी वाहनाने पुणे बाजूकडे निघून गेले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे परत पो.नि. पवार यांचेकडे 11.51 वा चे सुमारास येऊन सदरची हकीकत सांगितली. पो.नि. पवार व पंचानी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करुन घेतली. त्यानुसार लोकसेवक मुलाणी, भुकर मापक यांनी स्वत:साठी 10,000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याची खात्री झाली. त्यांनतर दोन्ही पंचांचे संमतीने पडताळणी कारवाई स्थगित करुन पो.नि.पवार यांनी मला, पंचाना तसेच सापळा पथकास गोपनीयतेच्या सुचना दिल्या. त्यांनतर पो.नि.पवार यांनी दिनांक 29/01/2024 रोजी लोकसेवक मुलाणी हे जमीनीचे हद्द मोजणी करणेकामी कोरेगाव पो. लोणंद ता. फलटण येथे येणार असल्याने पुढील सापळा कारवाई करण्याचा निर्णय पो.नि. पवार व पंचानी घेतला. फलटण ते लोणंद जाणारे रोडवरील चांदोबाचा निंब, मंदीर तरडगाव येथे येवून थांबण्याच्या सुचना देवुन मला घरी जाण्यास सांगीतले.

दिनांक 29/01/2024 रोजी मी, पोनि पवार व सापळा पथकास फलटण ते लोणंद जाणारे चांदोबाचा निंब, मंदीर तरडगाव येथे 10.00 वाजता भेटलो. त्यावेळी पो.नि.पवार यांनी सापळा कारवाईचे नियोजन करुन योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर लोकसवेक मुलाणी यांची भेट घेणेसाठी ते कोठे आहेत याची माहिती घेण्यासाठी मुलाणी साहेब यांच्या मोबाईल फोनवर विचारणा केली असता त्यांना त्याठिकाणी येण्यासाठी वेळ लागणार असल्याचे सांगितले. त्यानंतर.पोनि पवार यांनी सांगितले प्रमाणे मी 10 हजार रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष हजर केली. त्यानुसार पोनि पवार यांचे सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेतले.पो.नि. पवार यांनी अंथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावून सांगून सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती सांगितली. त्यानुसार पो.नि.पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली व अंथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली व लोकसेवक भुकरमापक मुलाणी लाचेची रक्कम दिल्यानंतर सापळा पथकास दिसले अशा रितीने डोक्यावरील टोपी काढून इशारा करण्याच्या सुचना पो.नि. पवार यांनी मला दिल्या.
थोड्यावेळाने पोनि पवार यांनी त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टचे आतील बाजूस लावून दिले. व तेथून 12.27 वा.चे सुमारास मी व पंच नं.1 खंडागळे असे आम्ही दोघे माझ्या मोटार सायकल वरून लोणंद ते फलटण रोडवरील पऱ्हर फाटा येथे जाणेकरीता रवाना झालो. आमचे पाठोपाठ सापळा पथक त्यांचे शासकीय वाहनाने पाठोपाठ आले. मी व पंच पऱ्हर गावात जाणारे रोडवर मोटार सायकल थांबवून लोकसेवक मुलाणी यांची वाट पाहत थांबलो. थोडया वेळानंतर लोकसेवक मुलाणी त्यांचे चारचाकी वाहनातून आले. त्यांनी मला वाहनात बसण्यास सांगितले. त्यामुळे मी माझी मोटार सायकल पंच नंबर 1 खंडागळे यांचेकडे दिली. व मी लोकसेवक यांचे वाहनामध्ये बसून आमचे जमीनीचे बाजूकडे जावू लागलो. त्यानंतर लोकसेवक मुलाणी यांनी पऱ्हर गावाकडे जाणारे रस्त्यावर असलेल्या सोटेक्स पॉलीपॅक, या कंपनीजवळ गाडी थांबवल्यानंतर आम्ही गाडीतून खाली उतरून मुलाणी साहेब यांचेशी माझ्या कामाबाबत चर्चा केली. तेव्हा मी त्यांना तुम्ही त्या दिवशी दहा हजार रुपये सांगितले होते, बघा की थोडं फार कमी झालं तर असे म्हणालो. त्यावेळी मुलाणी साहेबांनी ठिक आहे द्या, तीन काढून घ्या, असे म्हणाले तेव्हा मी आणलेल्या 10,000/- रुपयामधून 3,000/- रु काढून स्वत:कडे ठेवून 7000/- रुपये लाच रक्कम लोकसेवक मुलाणी यांचेकडे दिली असता त्यांनी ती मोजून घेवून त्यांच्या पँटच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यावेळी लाच रक्कम स्विकारलेबाबत सापळा पथकास दिसेल असा पुर्वनियोजित इशारा केला असता पोनि पवार व त्यांचे सहका-यांनी त्यांचे वाहनातून येवून लोकसेवक भुकरमापक, मुलाणी यांना लाचेच्या रक्कमेसह 12.51 वा.चे सुमारास ताब्यात घेतले. तसेच माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन पो.नि.पवार यांनी त्यांचे ताब्यात घेतला.
त्यानंतर पो.नि. पवार यांनी पंचासमक्ष सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह, लोणंद ता. खंडाळा जि. सातारा येथे करण्याचे निश्चित केले.

तरी दिनांक 29/01/2024 रोजी सोटेक्स पॉलीपॅक, कंपनीचे आडोशास मौजे कोरेगाव पो.लोणंद ता.फलटण येथे मोहंमद शफी इब्राहीम मुलाणी, वय- 49 वर्षे, कनिष्ठ लिपिक/भुकरमापक, उपअधीक्षक, भुमीअभिलेख, कार्यालय, फलटण वर्ग-3 यांनी आमच्या जमीनीची हद्दीची मोजणी करून खुणा कायम करण्यासाठी स्वत:साठी 10,000/- रु लाचेची मागणी करून तडजोडीअंती 7,000/- रु लाच रक्कम स्वत: 12.51 वाचे सुमारास स्विकारली म्हणून माझी त्यांचे विरुद्ध कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर मराठीमध्ये टंकलिखीत करण्यात आला असून तो बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली आहे.

समक्ष हा जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SUSHIL BHASKAR BHOSLE (I (Inspector)) / SSBM8601X **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

कैलास बाबुराव पांढर

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SUSHIL BHASKAR B

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): SSBM8601X

प्रत मिळाली

कैलास बाबुराव पांढर